पुणे विद्यार्थी टुडे. पान क्रं. ८.

सकाळ शनिवार, ८ जानेवारी २०११

# अध्यापक कार्यशाळेचे बारामती येथे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

बारामती, ता. ७ : येथील विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दोन आठवड्यांची 'आयएसटीई वर्कशॉप फॉर डेटाबेस मॅनेजमेंट सिस्टिम्स' ही ऑनलाइन अध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच पार पडली. केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभागाच्या राष्ट्रीय शिक्षण मिशनअंतर्गत (माहिती-तंत्रज्ञान) आयआयटी, मुंबई यांच्याकडून अद्ययावत संगणक प्रयोगशाळा असणाऱ्या भारतातील निवडक ३२ महाविद्यालयांची निवड झाली असून, त्यात विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा समावेश आहे.

टाटा कन्सलटन्सीचे उपाध्यक्ष एस. रामदोराई, प्रा. बनरार्ड मेनेझिज, कवी आर्या यांनी चर्चासत्रामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन प्राध्यापकांच्या शंकांचे निरसन केले.

पुणे विद्यापीठातील २५ अध्यापकांनी या कार्यशाळेचा लाभ घेतल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर यांनी दिली. आयआयटी-मुंबई यांनी यासाठी दोन लाख रुपयांची भरीव मदत संस्थेला देऊ केली होती. राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशीप्रमाणे देशाच्या प्रगतीसाठी उत्तम प्रतीच्या तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात प्रभावीपणे कसा करता येईल, यासाठी हा प्रयोग संपूर्ण देशात राबविला जात आहे.

आनंदसिद्धू रिपोर्टिंग

२०।१२।०१

दि.१३/०१/२०११

# अभियांत्रिकी महाविद्यालयत ऑनलाईन कार्यशाळा संपन्न

बारामती- केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या राष्ट्रीय शिक्षण मिशन (माहिती तंत्रज्ञान्न अंतर्गत आयआयटी मुंबई यांचेकडून अद्ययावत परिपूर्ण संगणक प्रयोगशाळा असणाऱ्या भारतातील निवडक अशा ३२ महविद्यालयांची रिमोट सेंटर म्हणून निवड करण्यात आली आणि हा मान विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महविद्यालयाला प्राप्त झाला असुन या अंतर्गत २ आठवड्यांची आयएसटीई वर्कशॉप फॉर डेटाबेस मॅनेजमेंट सिस्टिम ही ऑनलाईन अध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक १३ ते २३ डिसेंबर २०१० दरम्यान या महविद्यालयात यशस्वी पार पडली पुणे विद्यापीठातील सुमारे २५ अध्यापकांनी या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतला सदर कार्यशाळेसाठी सुमारे रु.२ लाख रुपयांची भरीव मदत आयआयटी मुंबई यांचेकडून प्राप्त झाली राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारशीप्रमाणे देशाच्या प्रगतीसाठी उत्तम प्रतीच्या तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणामध्ये प्रभावीपणे कसा करता येईल यासाठी हा प्रयोग संपुर्ण देशात राबविला जात आहे या कार्यशाळेमधुन टाटा कन्स्ल्टंसीचे उपाध्यक्ष श्री.एस. रामदोराई,प्रा. बनराई मेनेझिज व प्रा.कवि आर्या, आयआयटी मुंबई यांनी विविध तंत्रज्ञानावर आधारित चर्चासत्रामध्ये प्रत्यक्ष भाग घेऊन प्राध्यापकांशी संपर्क साधुन त्यांच्या प्रश्नांचे निरसन केले अशा प्रकारच्या कार्यशाळेचे प्रयोग देशातील अध्यापकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी व त्याद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या सर्वंगिण विकास साधण्यासाठी या प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन वारंवर करणे आयआयटीने ठरविले आहे सदर कार्यशाळा भरविण्याचा बहुमान या महविद्यालयाला प्राप्त झाला याचे सर्व श्रेय संस्थेची दुरदुष्टी संस्थेतील शिक्षकांचा सक्रीय सहभाग व महविद्यालयाच्या अद्ययावत प्रयोगशाळा या सर्वांमुळे मिळाला आहे अशा प्रकाच्या कार्यशाळांचे आयोजन वारंवार करण्याचा मनोदय प्राचार्य डॉ. एस.बी.देवसरकर यांनी व्यक्त केला असुन परिसरातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे अवाहन केले आहे.